"हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांच्या सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्याशाखेतील समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

★ संशोधक विद्यार्थी ★

विजय रामभाऊ कांबळे

एम.ए. (समाजशास्त्र), नेट/सेट

★ मार्गदर्शक ★

प्रा.डॉ. दहिकांबळे शिवाजी धोंडिबा

समाजशास्त्र विभाग प्रमुख
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी
ता. उमरी जि. नांदेड

★ संशोधन केंद्र ★

सामाजिक शास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च -२०२२

१. प्रास्ताविक

प्राचीन काळाच्या अभ्यासावरुन दिसून येते की, भारतीय समाजामध्ये स्त्रियांना अत्यंत आदराचे व मानाचे स्थान होते. समाजातील सर्व महत्त्वाच्या पदावर स्त्रिया ह्या प्राचीन काळापासून विराजमान होत्या. कुटुंबातील असो अथवा गटाच्या, समाजाच्या महत्त्वाच्या निर्णयामध्ये स्त्रियांचा सहभाग होता. भारतीय स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य काळानुरुप होते. भारतातील सर्वच धर्मांनी महिलांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. परंतु कालांतराने लिखाणांचा चुकीचा अर्थ किंवा त्यात घालघूसड यामुळे महिलांवर मोठ्या प्रमाणात बंधने टाकण्यात आली. खरे तर स्त्रीशिवाय पुरुषाचे जीवन अस्थिर व अधूरे असते. पुरुषाला कुटुंबवात्सल्य बनविण्याचे महान कार्य हे स्त्रियांनी केलेले आहे. पुरुष जंगलात भटकंती करत होता. त्यामुळे मानवाच्या सर्वांगीण प्रगतीकरीता स्त्रीने नेहमीच पुढाकार घेतलेला आहे.

वैदिक काळात मनुने मनुस्मृतीत पुरुष प्रधान संस्कृतीचे बीजारोपण केले आहे व तेव्हापासून स्त्रियांना दुय्यम स्थान दिले आहे.

"पिता रक्षति कोमार्य,
भर्ता रक्षति यौवने
रक्षति स्थाविरपुत्रा,
न स्त्री स्वातंत्र्य अर्हती"।

(सदंर्भ- मनुस्मृती १४ अध्यायानुसार)

या संस्कृत श्लोकाच्या अर्थाबद्दल वाद असला तरी त्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, स्त्रीला पुरुषांच्या आधारावर जगावे लागते. मनुस्मृतीत असेही सांगितले आहे की, नवरा जुलमी असला तरी बायकोनेच सहनच करावे. स्त्रियांना मालमत्ता देण्याच्या तो विरोधात आहे. पुरुषाला हवे तसे स्वातंत्र्य देतो. मात्र स्त्रीला पुरुषासोबत बांधून ठेवतो. थोडक्यात या काळात स्त्रीची भूमिका एक जन्मदात्री कुटुंबाला वारस देणारी आणि उपभोग्य वस्तू अशीच होती.

भारतात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन 'चुल आणि मुल' एवढ्यापुरताच मर्यादित होता. स्त्रियांवर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार होत होते. महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक या सर्वच बाबतीत दुय्यम स्वरुपाची वागणूक दिली जात होती. म्हणूनच ग्रामीण महिलांच्या सामाजिक दर्जाचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे.

बचत गट चळवळीचा इतिहास

बांगलादेशात महंमद युनूस यांनी बचत गटाची पध्दतशीर बांधणी केली. सन १९९८ मध्ये नाबार्डने पथदर्शक प्रकल्पाव्दारे स्वयंसहाय्यता बचत गट स्थापना व बँकांना जोडण्याचा प्रयत्न केला. या पथदर्शी प्रकल्पाचे परिणाम झालेले दिसल्यामुळे स्वयंसहाय्यता बचत गट प्रकल्पात सरकारी बँकाच्या संस्थेत वाढ करण्यात आली. सन १९९३ मध्ये बँकेने सर्व व्यावसायिक बँकांना बचत गटाचे खाते उघडण्याचा प्रस्ताव मांडला. सन १९८६ मध्ये राज्य सहकारी बँकेने ही या कार्यक्रमांशी जोडून घेतले. आता या लोक चळवळीला राज मान्यता मिळाली आहे.

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा महिलांच्या प्रामुख्याने ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात भर टाकणारा आहे. ग्रामीण महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून चूल आणि मुल व प्रपंच सांभाळून आपल्या घराला लहान-लहान उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून दारिद्र्यातून बाहेर काढले एवढेच नव्हे तर जिल्ह्यातील पुरुषांनाही त्यांच्या सारख्या उद्योग व्यवसायांना प्रवृत्त केले आहे.

आज देशातील ग्रामीण भागात स्त्रियांना संघटित करण्याची, स्त्रीयांच्या सबलीकरणाची, स्त्रियांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याची गरज आहे. आणि ते केवळ स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातूनच शक्य होते. बचत गटामुळे स्त्रीयांचा व्यक्तिमत्व विकास कसा झाला, तसेच तिच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर कसा उंचावला, बचत गटातील सदस्यांना कोणकोणत्या समस्या येतात, कोणकोणत्या अडचणी येतात, महिलांच्या सामाजिक समस्या कोणकोणत्या आहेत त्याचे स्वरुप कोणकोणते आहे ह्या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्याचा एक छोटासा प्रयत्न संशोधक करण्याचा प्रयत्न करीत आहे.

२. संशोधन समस्येची गरज

प्रस्तुत संशोधन समस्येच्या माध्यमातून संशोधकाला हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांच्या सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास करतांना बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिलांची स्थिती कशी होती, तसेच हिंगोली जिल्ह्यात महिला बचत गटांची स्थिती कशी आहे, महिला सदस्य बचत गटात सक्रीय राहतात किंवा नाही, महिला बचत गटातील सदस्यांना नेमक्या कोणकोणत्या समस्यांना

सामोरे जावे लागत आहे ह्या बाबी समजावून घेण्यासाठी ह्या संशोधन समस्येवर संशोधन होणे गरजेचे आहे असे संशोधकाला वाटते.

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्यातील महिला ग्रामीण मागासवर्गीय बचतगटांची संख्या किती आहे तसेच बचत गटामुळे स्त्रियांमध्ये कशाप्रकारे सामाजिक परितर्वन झाले ह्या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी संशोधन गरजेचे आहे.

३. संशोधनाचे महत्त्व

प्रस्तुत संशोधनामुळे हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांच्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करतांना आपल्याला हिंगोली जिल्ह्यातील महिला बचत गटाची संख्या किती आहे तसेच कोणकोणत्या समाजाचे किती बचत गट आहेत आणि बचत गटातील महिलांच्या कौटुंबिक स्थितीची माहिती ह्या संशोधनामुळे आपल्याला होईल तसेच शासनाला होईल. बचत गटासाठी शासनाच्या कोणकोणत्या सोयी सुविधा उपलब्ध करीत आहे याची सुध्दा माहिती मिळेल.

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्यातील बचत गटाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन कशा प्रकारे होते तसेच बचत गटाचे कार्य कशाप्रकारे चालते, कार्यपध्दती कशाप्रकारे चालते, महिला सक्षमीकरण प्रक्रियेत बचत गटाची भूमिका कशा प्रकारे आहे वरिल सर्व प्रश्नांची सर्वाची महत्त्वपूर्ण अशी माहिती विस्तृत प्रमाणात मिळत असल्यामुळे ह्या संशोधन समस्येचे महत्त्व आहे.

४. समस्या विधान

हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांच्या सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे.

५. समस्या विधानातील पारिभाषिक महत्त्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या

५.१ हिंगोली जिल्हा

हिंगोली जिल्हा हा मराठवाडा विभागातील उत्तरेस आहे. हिंगोली जिल्ह्यात दरवर्षी भारतातील दोन नंबरचा दसरा महोत्सव भरतो.

५.२ बचत गट

१) युनिसेफ- बचत गट आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी व समस्येवरील उपायासाठी, सामुदायिक प्रयत्न करण्याचे एक साधन आहे

२) कटारसिंह आणि राजी गैन- बचत गट स्वैच्छिक संघटन असून ज्यात सदस्य हे सामूहिक उद्देशांना पूर्ण करण्याकरीता एकत्र येत असतात

५.३. सामाजिक परिवर्तन

समाजामध्ये जीवन जगत असताना एखाद्या घटकामुळे दैनंदिन जीवनात जीवन जगत असतांना होणारा बदल तो सकारात्मक असो अथवा नकारात्मक त्याला सामाजिक परिवर्तन असे म्हणतात.

५.४ अभ्यास

१) एखाद्या समस्येचा समीक्षात्मक साधक-बाधक दृष्टीने केलेला विचार म्हणजे अभ्यास होय.

२) एखाद्या समस्येचे सखोल केलेले अध्ययन, हेतूपूर्ण, अर्थपूर्ण व कायमस्वरुपी बदल घडवून आणण्यास मदत करते, त्यास अभ्यास असे म्हणतात.

६. संशोधनाची उद्दिष्ट्ये

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत:

१) बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या वैयक्तिक, शैक्षणिक व आर्थिक, पार्श्र्वभूमीचा आढावा घेणे.

२) बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या सहभागामुळे त्यांच्या आर्थिक संपन्नतेतील बदलांचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण मागासवर्गीय महिला बचत गटांव्दारा चालविल्या जाणाऱ्या विविध व्यवसायांचे मूल्यमापन करणे.

४) ग्रामीण मागासवर्गीय महिला बचत गटाकरीता असलेल्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

५) ग्रामीण मागासवर्गीय महिला बचत गटातील महिलांच्या सहभागामुळे महिलांच्या नेतृत्वगुण, सामाजिक, राजकीय सहभाग तसेच महिलांच्या समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठरविणे.

६) बचत गटामुळे ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या सबलीकरणास प्रोत्साहन मिळते का? याचा अभ्यास करणे.

७) बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांच्या सामाजिक परिवर्तनातील समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

७. संशोधनाची गृहितके

१) बचत गट ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या सामाजिक उन्नतीचे साधन आहे.

२) बचत गटामुळे ग्रामीण मागासवर्गीय महिलांना शासकीय योजनांची माहिती मिळालेली आहे.

३) बचत गटामुळे ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या नेतृत्वगुणांत वाढ झाली आहे.

४) बचत गटामुळे ग्रामीण मागासवर्गीय महिलांना विविध व्यवसायाचे ज्ञान झाले.

५) महिला बचत गटामुळे ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या बाबतीत परिवर्तन होत आहे.

८. संशोधन व्याप्ती आणि मर्यादा

८.१ संशोधनाची व्याप्ती

८.१.१ क्षेत्र व्याप्ती: प्रस्तुत संशोधन समस्येचे क्षेत्र हिंगोली जिल्ह्याशी संबंधीत आहे.

८.१.२ आशय व्याप्ती: प्रस्तुत संशोधनाचा आशय हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण, मागासवर्गीय महिला सदस्यांच्या **सामाजिक परिवर्तनाशी संबंधीत आहे.**

८.१.३ घटक व्याप्ती: प्रस्तुत संशोधन हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला घटकाशी संबंधीत आहे.

८.२. संशोधनाची मर्यादा

८.२.१ क्षेत्र मर्यादा: प्रस्तुत संशोधन हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्य असलेल्या बचत गटापुरतेच मर्यादीत आहे.

८.२.२ आशय मर्यादा: प्रस्तुत संशोधन हे बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांच्या सामाजिक परिवर्तनाशीच निगडीत आहे.

८.२.३ घटक मर्यादा: प्रस्तुत संशोधन हे बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिलाशीच संबंधीत आहे.

८.२.४ कालमर्यादा: प्रस्तुत संशोधनामध्ये ४ ते ५ वर्षाच्या ग्रामीण मागासवर्गीय बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांच्या कालखंडाशी संबंधीत आहे.

९ संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक तसेच सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. हे संशोधन प्राथमिक व व्दितीय स्त्रोतावर अवलंबून आहे

९ संशोधनाची मर्यादा

हिंगोली जिल्ह्यातील ५ तालुक्यातील ४६० ग्रामीण मागासवर्गीय महिला बचत गटाचा अभ्यास करण्यात येणार असून एकूण १२० गटाची नमूना म्हणून निवड करण्यास येईल.

१०. संशोधन साधने

प्रस्तुत संशोधनात माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मतावली, अनुसूची, अवलोकन, निरीक्षण संशोधन साधनाचा वापर करण्यात येणार आहे.

११. जनसंख्या व न्यादर्श

प्रस्तुत संशोधनात हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला ह्या संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श आहे.

१२. न्यादर्श निवड

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाला संशोधन प्रक्रियेत संपूर्ण जनसंख्येचा समावेश करणे शक्य नाही. जर तसे केले तर खर्च, वेळ व श्रमही वाढतात. त्यामूळे काम सोपे व यथार्थ होण्याच्या दृष्टीकोनातून संशोधक यादृच्छिक नमूना निवड या पध्दतीचा न्यादर्श निवडीकरीता वापर करणार आहे.

१३. माहिती संकलन आणि सांख्यिकीय तंत्र

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी प्राथमिक व व्दितीय या दोन्ही स्त्रोतांचा वापर करण्यात येईल. उदा. प्राथमिक स्त्रोतांमध्ये प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची आणि निरीक्षण या पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

व्दितीय स्त्रोतांमध्ये विविध संदर्भग्रंथ, व्यक्तिगत प्रलेख, आत्मचरित्र व जीवनचरित्र, पीएच.डी. चे शोधप्रबंध, विविध नियतकालिके उदा. साप्ताहिके, मासिके, त्रैमासिक, अर्धवार्षिक, वार्षिक अंक इत्यादींचा वापर केला जाणार आहे.

संशोधक प्रश्नावलीव्दारे माहितीचे संकलन करुन अर्थनिर्वचनासाठी शेकडेवारी ह्या सांख्यिकीय परिमाणाचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली आणि मुलाखत यांचा वापर करण्यात येणार आहे.

१४. कार्यवाहीचे टप्पे

समस्या निश्चिती

↓

आराखडा सादरीकरण

↓

आराखडा अंतिम मंजुरी

↓

गतसंशोधने व संबंधीत साहित्याचा आढावा

↓

साधन निर्मिती

↓

जनसंख्या व नमूना निवड

↓

साधनाच्या साहाय्याने माहिती गोळा करणे

↓

माहितीचे संकलन

↓

माहितीचे अर्थनिर्वचन

↓

निष्कर्ष व शिफारशी

↓

अहवाल लेखन

↓

सादरीकरण

१५. प्रकरण योजना

प्रकरण पहिले

प्रास्ताविक:

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'हिंगोली जिल्ह्यातील बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांचा सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्याचा इतिहास, भौगालिक स्थिती आणि बचतगटामुळे हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण मागासवर्गीय महिलांमध्ये कशाप्रकारे परिवर्तन घडवून येत आहे याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक तसेच सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. हे संशोधन प्राथमिक व व्दितीय स्त्रोतावर अवलंबून आहे.

प्रकरण तिसरे

बचत गटातील महिलांची पार्श्वभूमी

बांगलादेशात महंमद युनूस यांनी बचत गटाची पध्दतीशीर बांधणी केली. सन १९९८ मध्ये नाबार्डने पथदर्शक प्रकल्पाव्दारे स्वयंसहाय्यता बचत गट स्थापना व बँकांना जोडण्याचा प्रयत्न केला. या पथदर्शी प्रकल्पाचे परिणाम झालेले दिसल्यामुळे स्वयंसहाय्यता बचत गट प्रकल्पात सरकारी बँकांच्या संस्थेत वाढ करण्यात आली. सन १९९३ मध्ये बँकेने सर्व व्यवसायीकांना बँकांना बचत गटाचे खाते उघडण्याचा प्रस्ताव मांडला. सन १९८६ मध्ये राज्य सहकारी बँकेनेही या कार्यक्रमाशी जोडून घेतले. आता या लोकचळवळीला राजमान्यता मिळाली आहे. तसेच बचत गटामुळे ग्रामीण मागासवर्गीय महिलांच्या परिस्थिती मध्ये हळूहळू बदल झालेला आपणास प्रथमदर्शनी दिसून येईल.

प्रकरण चौथे

बचत गटातील महिलांचा सामाजिक सहभाग

स्वयंसहाय्यता बचत बटात सर्व सभासदांना गरजा व उद्दिष्ट्ये याबाबत समानता किंवा साधर्म्य असणारे लोक एकत्र येतात. समान विचार व गरजांमुळे गटबांधणी होऊन

गटाचा विकास होतो. त्यामुळे सभासदांच्या गरजांची पूर्तता होऊ शकते म्हणून गटातील संभासद समानतेला महत्व देणारे असतात. तसेच गटातील सभासदांचा आर्थिक, सामाजिक स्तर सारखाच असतो. सर्व सभासदांची उद्दिष्ट्ये समान असतात. म्हणून सर्वांना समान फायदा होतो.

प्रकरण पाचवे

बचत गटातील महिलांचे सबलीकरण

बचत गटामुळे ग्रामीण मागासवर्गीय महिलांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक अशा सर्व बाबतीत प्रथमदर्शनी सबलीकरण होत आहे. आपणास दिसून येते. कारण बचतगटामुळे महिलांच्या हातात पैसा आल्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळालेले आहे. त्यातून ते लघुउद्योग, कुटीरउद्योग, शेळीपालन, म्हैसपालन असे उद्योग करुन बचत गटामुळे महिलांचे सक्षमीकरण झाले आहे.

प्रकरण सहावे

सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

थोडक्यात वरील संशोधनाच्या अंती अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, बचत गटातील ग्रामीण मागासवर्गीय महिला सदस्यांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक इत्यादी बाबीचा आढावा घेऊन ग्रामीण मागासवर्गीय महिलामध्ये बचतगटामुळे सामाजिक सर्वच बाबतीमध्ये परिवर्तन झाल्याचे आपणास दिसून येईल.

कारण पारंपारिक समाजामध्ये महिला फक्त चूल आणि मूल एवढ्या पुरत्याच मर्यादीत होत्या. पण आजच्या आधुनिक काळामध्ये महिलांच्या सर्व स्तरात परिवर्तन झाल्याचे आपणास दिसून येते. महिला ह्या बचत गटामुळे काही अंशी का होईना स्वावलंबी झाल्याचे आपणांस दिसून येते. शासनाच्या विविध योजनांमधून सक्षमीकरण करण्यास हातभार लावत असल्याचे प्रथमदर्शनी तरी दिसून येते.

संदर्भग्रंथ सूची

१. पाटील, ली., (२०१०), 'मुलींचा बदलता सामाजिक दर्जा, निरंतर शिक्षण धारा, फेब्रुवारी-मार्च त्रैमासिक'.

२. आपटे, ज.श., रोडे, पु., (२००८), 'भारतातील महिला विकासाची वाटचाल', डायमंड पब्लीकेशन, पुणे.

३. मुलानी एम.यु., (२००८), 'अल्पबचत नियोजन', डायमंड पब्लीकेशन, पुणे.

४. कुलकर्णी, वि., (२०००), 'बचतनामा', चैतन्य प्रकाशन, पुणे.

५. कथिले र., (२००६), 'महिला बचत गट', गोडवा प्रकाशन, पुणे.

६. विशे, र.ग., (२००२), 'महाराष्ट्रातील स्वयंसाहाय्यता गट व महिलांचे सबलीकरण', जव्हार तालुका, जिल्हा ठाणे.

७. बारबोले, (२००७), 'उस्मानाबाद जिल्ह्यातील महिला बचत गट : एक दृष्टिक्षेप', योजना, एप्रिल.

८. मुळे रा.श. आणि उमाठे वि.तु., (१९०८), 'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे', पुणे.

९. Best J.W., (1997), 'Research in Education IIIrd Edition', New Delhi : Prentice Hall of India Ltd.

१०. भिंताडे वि.रा., (२००७), शैक्षणिक संशोधन, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.

११. प्रा.डॉ. धारवाडकर दीपक, भालेराव साहेबराव, (२०१७), भारतीय समाज- समकालीन समस्या, रुद्राणी पब्लीकेशन, भोकर.

१२. प्रा.डॉ. धारवाडकर दीपक, भालेराव साहेबराव, (२०१४), सामाजिक नियंत्रण एवं परिवर्तन, श्रीराम प्रकाशन, कानूपर.

१३. डॉ. महेशकुमार परदेशी, प्रा. डॉ. धारवाडकर दीपक, (२०१४), आधुनिक भारत में सामाजिक समस्याएँ

१४. आहुजा, राम, (२००६), सामाजिक समस्यायें रावन पब्लिकेशन, जयपूर.

१५. प्रभात विकास मंच, 'धुळे महिला स्वयंसहाय्य बचत गट', माहितीपत्र

१६. युनुस, महंमद, (१९९६), ग्रामीण बँक.

संशोधक
विजय रामभाऊ कांबळे
एम.ए. (समाशास्त्र), नेट, सेट

मार्गदर्शक
प्रा.डॉ. दहिकांबळे शिवाजी धोंडिबा
समाजशास्त्र विभागप्रमुख
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर
महाविद्यालय, उमरी, ता. उमरी जि. नांदेड